**<u>ठळक बातम्या</u>**

- नवी दिल्ली इथं क्वाड देशांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांच्या बैठकीत परस्पर सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा /इतर देशांनाही मदत करण्यावर भारताचा भर

- सावंतवाडी रेल्वे स्थानकाला मधु दंडवते यांचं नाव द्यायचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- राज्यातल्या ८९ हजार ७३१ कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या पात्रता फेरीतला पहिला सामना आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात रंगणार

**आणि**

- नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन आज केरळमधे होण्याची शक्यता

**<><><><><><>**

नवी दिल्ली इथे परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्या अध्यक्षतेखाली आज क्वाड देशांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची बैठक झाली. क्वाड राष्ट्रांमधलं सहकार्य अधिक दृढ करण्यावर आणि त्याचबरोबर इतरांनाही मदत करण्यावर डॉ. जयशंकर यांनी या बैठकीत भर दिला. क्वाड राष्ट्रं ही लोकशाहीप्रधान, मुक्त समाज असलेली राष्ट्रं असून, समृद्धीसाठी नावीन्य आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन, तसंच दहशतवादाच्या सामायिक धोक्याचा सामना करण्यावर भर देतात, असं जयशंकर म्हणाले.

क्वाड राष्ट्रांना आर्थिक धोरणात्मक साधनांचा लाभ घेण्यासाठी तसंच खाणकाम आणि प्रक्रिया तसंच महत्त्वपूर्ण खनिजांच्या पुनर्वापरासह महत्त्वपूर्ण खनिज पुरवठा साखळी मजबूत करण्याकरता गुंतवणुकीत समन्वय साधण्यासाठी

'क्वाड क्रिटिकल मिनरल्स फ्रेमवर्क' मार्गदर्शन करेल, असं अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्को रुबियो म्हणाले. होर्मुझच्या सामुद्रधुनीमधे मुक्त आणि सुरक्षित सागरी मालवाहतूक सुनिश्चित करण्यासाठी तसंच पश्चिम आशियामध्ये स्थैर्य आणण्यासाठी राजनैतिक प्रयत्नांची गरज जपानचे परराष्ट्र व्यवहार मंत्री तोशिमित्सू मोतेगी यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

सावंतवाडी रेल्वे स्थानकाला कोकण रेल्वेचे शिल्पकार माजी रेल्वेमंत्री दिवंगत मधु दंडवते यांचं नाव द्यायचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला आहे. आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. त्यानुसार या स्थानकाचं नाव ‘लोकमान्य मधु दंडवते रेल्वे टर्मिनस’ असं असेल. तसा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवला जाणार आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधल्या सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ द्यायचा निर्णयही आज मंत्रिमंडळानं घेतला. जनगणनेच्या कामासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या करु नयेत असे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. त्यामुळे ही निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या ८९ हजार ७३१ कोटी रुपयांच्या पाच विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या उपस्थितीत मुंबई इथं झालेल्या उद्योग विभाग मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत आज हा निर्णय झाला. कोल गॅसिफिकेशन एँड डाऊनस्ट्रीम डेरीव्हेटिव्ह्ज, सोलर सेल मॉड्युल, इग्नॉट, वेफर्स पॅनेल, इलेक्ट्रिक स्टील, पेट टायर कॉर्ड तसंच सिंथेटिक ग्रॅफाइट ॲनोड मटेरियल या प्रकल्पांना प्रोत्साहन दिलं जाणार आहे. या प्रकल्पांमुळे राज्यात अंदाजे २० हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार आहे, तसंच विदर्भ, मराठवाडा, नाशिकसह

राज्यातल्या विविध भागात औद्योगिक विकासाला चालना मिळेल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

राज्यातल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकारशी चर्चा सुरू आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मुंबईत बातमीदारांशी बोलताना सांगितलं. या बाबतीत दीर्घकालीन उपाययोजनांवर चर्चा करण्यासाठी उद्या केंद्र सरकारशी चर्चा होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. कांदा खरेदीचा दर साडे तीन रुपयांवरून, केंद्र सरकारनं १५ रुपये प्रतिकिलो केला आहे. यावर विरोधकांनी राजकारण करू नये, असं ते म्हणाले..

**होल्ड.. बाईट - मुख्यमंत्री ( २० सेकंद)**

**<><><><><><>**

नाशिक मधल्या कांद्याला १ हजार ५८० रुपये प्रति क्विंटल हमीभाव आजपासून लागू झाल्याचं केंद्र सरकारनं परिपत्रकाद्वारे सांगितलं आहे. कांद्याचे दर कोसळल्याने नाशिक जिल्ह्यात ठिकठिकाणी आंदोलनं झाली होती, त्यामुळे हा निर्णय सरकारने काल घेतला. हे दर फक्त नाशिक जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांसाठीच असतील.

**<><><><><><>**

कांद्याला २४ रुपये प्रतिकिलो इतका हमीभाव मिळावा या मागणीसाठी आज नाशिक जिल्ह्यात चांदवड इथे महाविकास आघाडीच्या नेतृत्वाखाली रास्तारोको आंदोलन करण्यात आलं. मुंबई-आग्रा महामार्गावरच्या या आंदोलनात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अंबादास दानवे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांच्यासह अन्य नेते, कार्यकर्ते आणि शेतकरी सहभागी झाले होते. गळ्यात कांद्याच्या माळा घालून तसंच

बैलगाडीतून आलेल्या नेत्यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर टीका केली. यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत पात्रता फेरीतला पहिला सामना गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात आज होणार आहे. धर्मशाला इथं थोड्याच वेळात, साडे सात वाजता हा सामना सुरू होईल.

गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><><>**

नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन आज केरळमधे होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. केरळमधल्या १४ पैकी चार जिल्ह्यांमधे जोरदार पाऊस पडेल असा अंदाज आहे. केरळ आणि लक्षद्वीप इथल्या १४ हवामान केंद्रांपैकी ६० टक्के केंद्रांवर, पुढचे दोन दिवस २ पूर्णांक ५ दशांश मिलीमीटर पावसाची नोंद झाली तर मान्सूनचं आगमन झालं असं अधिकृतपणे जाहीर केलं जाईल.

**<><><><><><>**

वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि नीट प्रश्नपत्रिका पेपरफुटी आदी मुद्द्यावरून आज नागपूरात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने संविधान चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत सायकल मोर्चा काढला. यावेळी केंद्र आणि राज्य सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत निषेध नोंदवण्यात आला. या मोर्चात माजी मंत्री अनिल देशमुख यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**<><><><><><>**

वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि नीट परीक्षेतल्या कथित गैरव्यवहाराच्या मुद्द्यावरून आज नागपूरात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं संविधान चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत सायकल मोर्चा काढला. महागाई आणि इंधन

दरवाढीमुळे जनतेचं कंबरडं मोडलं असूनही सरकार याकडे गांभीर्यानं पाहत नाही, अशी टीका पक्षाचे नेते अनिल देशमुख यांनी यावेळी केली. या आंदोलनात पक्षाचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**<><><><><>**

राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून, कोणत्याही प्रकारची इंधन टंचाई नसल्याचं अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी स्पष्ट केलं आहे. मंत्रालयात आयोजित राज्यातील पेट्रोल-डिझेल वितरणाबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. काही भागांत अफवांमुळे नागरिकांकडून अतिरिक्त इंधन खरेदी होत असल्याने पेट्रोल- डिझेल विक्रीत लक्षणीय वाढ झाल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून अनावश्यक साठा करू नये, असं आवाहन भुजबळ यांनी केलं.

**<><><><><>**

नीट पेपरफुटी प्रकरणाचा तपास करणारं सीबीआयचं पथक सलग बाराव्या दिवशीही लातुरात तळ ठोकून असून, या पथकानं आता विद्यार्थी, पालक आणि शिकवणी वर्गांच्या तपासावर लक्ष केंद्रित केलं आहे. त्या व्यतिरिक्त सीबीआयनं आणखी एका डॉक्टरचीही चौकशी केल्याचं सांगितलं जात आहे.

तपासादरम्यान मिळालेल्या माहितीतून सीबीआय पुढचे धागेदोरे जोडण्याचा प्रयत्न करत आहे. विविध कागदपत्रं, पुरावे आणि संबंधितांच्या जबाबांच्या आधारे सीबीआय तपास पुढं नेत आहे.

**<><><><><>**

धाराशिव जिल्ह्यामधल्या उमरगा नगरपालिकेचे माजी उप नगराध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांचं आज ब्रेनस्ट्रोकने निधन झालं. ते ६८ वर्षांचे होते. कुलकर्णी दोन वेळा उमरगा नगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून गेले होते. तसंच इथल्या

राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्थेचे ते काही काळ अध्यक्ष होते. आज संध्याकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<><><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी काही गारपीट झाली. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भात अनेक ठिकाणी उष्णतेची लाट होती. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान ब्रम्हपुरी इथं ४७ पूर्णांक ६ दशांश इतकं होतं.

येत्या दोन दिवसात, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><><>//**